झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोनिआ/ ८५ /२०२२
दिनांक : २५ / ०९ /२०२२

# अंतिम झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.२९९१, २९९२, गणेशनगर, भोसरी, एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुर्ण झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३९९०.३७ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.पुर्णायु एन्टरप्रायझेस यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२८/०७/२०२१ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि. २६/१०/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट २ नुसार सदर मिळकतीवर एकूण २५० झोपडया असून त्यापैकी निवासी पात्र १९३, अपात्र ५६ व बंद ० आणि बिगर निवासी पात्र ०, अपात्र ० आणि सार्वजनिक बांधकामे एकूण १ या प्रमाणे एकुण पुनर्वसनास पात्र झोपडीधारक -१९३ तर अपात्र झोपडीधारक ५६ इतके ठरले आहेत; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये पारित आदेशाद्वारे **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा अंतिम आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०१ ते ०७ जुलै, २०२१ पृष्ठ क्र. ५ व ६ वर प्रसिध्द करणेत आलेला आहे. तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा रितीने योजनाक्षेत्रात दि.१४/०८/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे;

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही आणि म्हणून, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.११-१७ नोव्हेंबर २०२१ पृष्ठ क्र.६ व ७ वर आणि सांज महानगरी व विश्वेश्वर या वृत्तपत्रात दि.१०/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.०१/११/२०२१ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक पुर्वसूचनेद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेल्यो संस्था यांना सदर क्षेत्राबाबत कळविणेत आले होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी दि.२४/११/२०२१ (या कार्यालयास प्राप्त दि.२९/११/२०२१) रोजीच्या पत्रान्वये त्यांचे मालकीच्या मिळकतीवर योजना राबविणेकरीता प्रचलित रेडीरेकनर दराच्या २५% रक्कम भरणेबाबत विनंती केली होती. त्यास अनुसरुन या कार्यालयामार्फत दि.२४/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना कळविणेत आले आहे.

(९२)

ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेतील नमूद ३० दिवसांच्या कालावधीत सदर क्षेत्रातील प्रत्येक झोपडी पाडून त्याखालील क्षेत्र मोकळे करून ती जागा विकसक यांच्या ताब्यात देण्यास फर्मावण्यात आले होते तथापि, योजनेतील पात्र आणि अपात्र दोन्ही झोपडीधारकांसाठी संक्रमण शिबीरामध्ये व्यवस्था केलेली आहे. तर काही झोपडीधारकांना मासिक भाडे देवून त्यांची राहणेची व्यवस्था पाहणार आहोत. सदर योजनेमधील एकूण २५० (निवासी २४९, सार्वजनिक १) झोपडीधारकांपैकी २४० झोपडीधारक संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत होणेस तयार आहेत. परंतु उर्वरित एकूण ९ अपात्र झोपडीधारक अद्याप संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत होत नसल्याचे दि.१३/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विकसक यांनी कळविलेले आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

<u>झोपडपट्टीचे नाव</u> : सि.स.नं.२९९१, २९९२, गणेशनगर, भोसरी, एम.आय.डी.सी., पिंपरी चिंचवड, पुणे
<u>महानगरपालिका क्षेत्र</u> : पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

## अनुसूची

| गाव | स.नं./ सि.स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| भोसरी एम.आय .डी.सी., | सि.स.नं. २९९१, २९९२ | ३९९०.३७ चौ. मी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | **पुर्वेस** -टेल्को रोड<br>**पश्चिमेस** - सि.स.नं.२९४८, २९४९, २९५०<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.२९९०<br>**उत्तरेस** - सि.स.नं.२९९३ पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

२७.१.२०२२

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक** :-२७/०१/२०२२

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

o/c

प्रत -
१) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे
२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
३) व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६